**महाराष्ट्र शासन**
जलसंपदा विभाग,
१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
ईमेल:- dayanand.munjale@nic.in दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८७०७८०

क्रमांक :- ज्येष्ठता २०२२/प्र.क्र.१४१/आस्था (अतांत्रिक) दिनांक :- २९/०४/२०२२

प्रति,
अधीक्षक अभियंता तथा परिमंडळीय अधिकारी, दक्षता पथक, मुंबई परिमंडळ, ठाणे
अधीक्षक अभियंता तथा संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे
अधीक्षक अभियंता (दरवाजे) तथा परिमंडळीय अधिकारी, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक
अधीक्षक अभियंता तथा परिमंडळीय अधिकारी, दक्षता पथक, अमरावती
अधीक्षक अभियंता तथा परिमंडळीय अधिकारी, नागपूर
अधीक्षक अभियंता तथा परिमंडळीय अधिकारी, दक्षता पथक, मुंबई परिमंडळ, औरंगाबाद
अधीक्षक अभियंता तथा परिमंडळीय अधिकारी, कोयना बांधकाम मंडळ, कोल्हापूर परिमंडळ, सातारा.

विषय :- जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयातील अधीक्षक संवर्गाची शासन स्तरावरील सन २०१९, सन २०२० व सन २०२१ या वर्षांची ज्येष्ठतासूची प्रसिध्द करणेबाबत.

जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयातील अधीक्षक संवर्गाची शासन स्तरावर सन २०१९, सन २०२० व सन २०२१ या वर्षाची ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्याचे प्रस्तावित आहे. तद्नुषंगाने, दि.१ जानेवारी, २०१९ ते दि.३१ डिसेंबर, २०१९, दि.१ जानेवारी, २०२० ते दि.३१ डिसेंबर, २०२०, दि.१ जानेवारी, २०२१ ते दि.३१ डिसेंबर, २०२१ या वर्षात कार्यरत असणाऱ्या सर्व अधीक्षकांची वर्षनिहाय माहिती सोबतच्या प्रपत्र-अ मध्ये शासनास सादर करण्यात यावी.

२. मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत त्यांच्या जात प्रवर्गाचा तसेच त्यांच्या जातीचे वैधता प्रमाणपत्र प्राप्त असल्यास त्याबाबतचा स्पष्ट उल्लेख सदर विवरणपत्रामध्ये करावा. तसेच, ज्या मागासवर्गीय अधीक्षकांची जात पडताळणी अद्याप झालेली नाही, त्यांना ती तात्काळ करुन घेऊन वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या स्पष्ट सूचना द्याव्यात. वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय त्यांचा मानीव दिनांक, पुढील पदोन्नती तसेच इतर अनुषंगिक लाभासाठी विचार करण्यात येणार नाही, ही बाब आवर्जून निदर्शनास आणावी.

३. उपरोक्त वस्तुस्थिती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देऊन आपल्या अधिपत्याखालील विहित कालावधीत कार्यरत असणाऱ्या सर्व अधीक्षकांची परिपूर्ण व अचूक (सेवानिवृत्त/ स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्यास सेवानिवृत्ती/ स्वेच्छासेवानिवृत्तीच्या दिनांकासह, मृत्यू झाल्यास मृत्यूच्या दिनांकासह) एकत्रित वर्षनिहाय माहिती सोबतच्या प्रपत्र-अ मध्ये शासनास तात्काळ सादर करावी, ही विनंती.

(विशाखा स. आढाव)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत : माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी,
१. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
२. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपल्या अधिपत्याखालील कार्यरत अधीक्षकांची परिपूर्ण माहिती संबंधित परिमंडळ कार्यालयास उपलब्ध करुन द्यावी.
३. आस्था (अतांत्रिक) संग्रहार्थ.

# प्रपत्र-अ

**कालावधी :- दिनांक १ जानेवारी, ....... ते दिनांक ३१ डिसेंबर, .........**

| ज्येष्ठता क्रमांक | शासकीय कर्मचाऱ्याचे नांव | संबंधित पदावरील नियुक्तीचा मार्ग | जन्मदिनांक (दिनांक-महिना-वर्ष) | प्रवर्ग | संवर्गात प्रत्यक्ष रुजू दिनांक | ज्येष्ठतेचा दिनांक (दिनांक-महिना-वर्ष) | सेवानिवृत्तीचा दिनांक (दिनांक-महिना-वर्ष) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |